संत भक्तराज महाराज यांची शिकवण (खंड २)

# साधनाविषयक सुवचने

## अनुक्रमणिका

( काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे ( मुद्दे.) '*' या चिन्हाने दर्शवली आहेत. )


– भूमिका ०६

– सुवचनांतून शिकविणे (सुवचनांचा भावार्थ) ०९

– भजनांच्या निरुपणाच्या माध्यमातून शिकविणे ५५

– विनोदांतून शिकविणे ५७

– परीक्षेतून शिकविणे ६३

प्रकरण १

भूमिका

१. पहिल्या आवृत्तीची भूमिका १०

२. दुसऱ्या आवृत्तीची भूमिका १५

३. तिसऱ्या आवृत्तीची भूमिका १६

४. चौथ्या आवृत्तीची भूमिका १६

५. पाचव्या आवृत्तीची भूमिका १६

प्रकरण २

सुवचनांतून शिकविणे ( सुवचनांचा भावार्थ )

१. साधक आणि साधना ११

१ अ. साधनेतील अडचणी ११

१ आ. अडचणींवर मात १३

१ इ. साधना १४

२. शिष्य २२

२ अ. गुरूंनी दिलेले नाव २२

| | |
|---|---|
| २ आ. 'गुरूंपासून दूर आहोत' असे वाटणे | २२ |
| २ इ. गुरु म्हणजे शरीर नव्हे | २३ |
| २ ई. गुरूंनी सांगितल्याप्रमाणे साधना करण्याचे महत्त्व | २३ |
| २ उ. गुर्वाज्ञापालनाने आज्ञाचक्राचा भेद होणे | २३ |
| २ ऊ. गुरूंकडे काय मागावे ? | २३ |
| २ ए. खरा शिष्य | २३ |
| २ ऐ. खरी प्रगती | २४ |
| २ ओ. चांगले वाईट सर्व गुरूंचे | २४ |
| ३. गुरु | २५ |
| ३ अ. महत्त्व | २५ |
| ३ आ. खरे स्वरूप | २५ |
| ३ इ. अनुभव व बुद्धी | २६ |
| ३ ई. गुरु-शिष्य नात्याविषयी गुरूंचा दृष्टीकोन | २६ |
| ३ उ. लाडका शिष्य | २७ |
| ३ ऊ. कार्य | २७ |
| ४. कर्मयोग | २९ |
| ५. भक्तीमार्ग | ३० |
| ५ अ. श्रद्धा आणि भक्ती | ३० |
| ५ आ. भक्ती | ३० |
| ५ इ. श्रद्धेचे महत्त्व | ३१ |
| ५ ई. नास्तिक आणि आस्तिक | ३२ |
| ५ उ. खरे समजणे | ३२ |
| ५ ऊ. देवाचे गुण | ३२ |
| ५ ए. ईश्वरालाच जिंकणे | ३४ |
| ५ ऐ. देव आणि भक्त | ३४ |
| ५ ओ. देवाकडे ऐहिक सुख मागू नये | ३५ |
| ५ औ. सगुण आणि निर्गुण | ३५ |
| ६. ज्ञानयोग | ३६ |
| * वरवरच्या अभ्यासाची व्यर्थता | ३६ |

* खरे सुख (आनंद) आणि दुःख ३७
* प्रेम आणि प्रीती ४३
* खरे नाते ४४
* सत्य आणि असत्य ४४
७. कुंडलिनीयोग ४८
८. अहंभाव नको ४९
९. संत ४९
९ अ. संतांची लक्षणे ४९
९ आ. संतांकडून मिळवायच्या गोष्टी ५२
९ इ. आश्रमाविषयीचा दृष्टीकोन ५२
९ ई. इतरांकडे बघण्याचा दृष्टीकोन ५३
९ उ. साधकाविषयीचा दृष्टीकोन ५३

**प्रकरण ३**

**भजनांच्या निरुपणाच्या माध्यमातून शिकविणे**

१. भजन : प्रभू या माया बाजारी । ५५
२. भजन : मन रंगले आत्मारामी । ५६

**प्रकरण ४**

**विनोदांतून शिकविणे**

१. साधना करीत रहा ५८
२. आहे त्यात सुखाने रहाणे ५८
३. पैसा साठवू नका ५८
४. पाय धरण्याचे महत्त्व ५९
५. सांप्रदायिकतेत अडकू नका ५९
६. कर्मकांड नको ५९
७. नियम आणि बंधन यांच्या पलीकडे ६०
८. अनेकातून एकात जा ६०
९. संकल्प नाही, तर विकल्प सोडायचा असतो ! ६०

१०. कार्यकर्ता होऊ नका ६०
११. सेवेचे महत्त्व ६१
१२. देवाला अंतःकरणात ठेवा ६१
१३. अहंभाव ६२
१४. आश्रमाचे विश्वस्त म्हणजे अधिकृत भिकारी ! ६२
१५. सर्व प्रसंगी शिष्याच्या भल्याचाच विचार ६२
१६. व्यावहारिक वेडेपणा म्हणजे प्रगती ६२
१७. जीवनाविषयीची सुवचने ६२

## प्रकरण ५
## परीक्षेतून शिकविणे

१. प्रश्न विचारणे ६४
२. पैशाचा मोह नको ६४
३. आजाराला पोषक उपचार ! ६५
४. आई-वडिलांचा आजार ६५
५. गुरूंचा प्रश्न, इच्छा आणि आज्ञा ६५
६. इतर कर्तव्ये कि गुर्वाज्ञापालन ? ६५
७. आंब्यांची तस्करी ! ६६
८. इतर संत आणि गुरु ६६
९. बोलाची कढी आणि बोलाचाच भात ! ६७
१०. सर्व गुरूंचेच ६७

# मनोगत

## १. पहिल्या आवृत्तीची भूमिका

## [गुरुपौर्णिमा, कलियुग वर्ष ५०९४ ( १४ जुलै १९९२ )]

आमचे सद्गुरु प.पू. भक्तराज महाराज यांना आम्ही 'बाबा' म्हणतो. गेल्या तीन-चार वर्षांत बाबांनी वेळोवेळी अध्यात्मविषयक बऱ्याच गोष्टी सांगितल्या व त्या आम्ही लिहून घेतल्या. 'त्या गोष्टी जिज्ञासू व साधक यांना ज्ञात व्हाव्यात, यासाठी एक पुस्तक लिहावे', असा विचार आमच्या मनात गेली दोन-तीन वर्षे सतत येत होता. 'या गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने सर्व लिखाण पूर्ण करावे', असे वाटले.

**१ अ. इदं न मम । :** बाबांनी एकदा सांगितले, "ग्रंथाचा श्रीगणेशा करा." त्यावर मी (डॉ. जयंत आठवले यांनी) म्हटले, "वासना पूर्ण नाहीशी झाल्याविना लिहू कसे ? ग्रंथ चांगला १०० टक्के सत्य कसा होईल ?" म्हणजे ग्रंथ कधी लिहायचा, ते लिहिण्याची माझी क्षमता आहे कि नाही, हे बाबांपेक्षा मीच ठरवित होतो !

बाबांनी आज्ञा करूनही लिखाणाविषयी मनात विकल्प आला म्हणून मला (डॉ. जयंत आठवले यांना) खूप खंत वाटली. 'गुरुवचनावर आपली पूर्ण श्रद्धा अजूनही नाही', याची लाज वाटली. मात्र या जाणिवेतून प्रयत्नपूर्वक लिहायला प्रारंभ करायची प्रेरणाही मिळाली व पुढे बाबांच्याच कृपेने सर्व लिखाणही पूर्ण होऊ शकले.

**१ आ. वैशिष्ट्य :** दोन-तीन वर्षांपूर्वी बाबांशी बोलतांना एकदा आम्ही म्हटले होते, "अध्यात्मातील बऱ्याच पुस्तकांच्या प्रस्तावनांत लेखकांनी असे लिहिलेले असते, 'यातील योग्य (बरोबर) आहे ते सर्व श्री गुरूंचे व चुका असतील त्या सर्व माझ्या.' अशा प्रकारचे लिखाण आम्हाला करायचे नाही. लिहू ते सत्यच असले पाहिजे, तरच लिहू." त्यावर बाबांनी हा विचार योग्य असल्याचे सांगितले होते. 'पूर्णपणे सत्य विचारच बाबा आमच्याकडून लिहून घेणार आहेत', याची तेव्हा आम्हाला जाणीव नव्हती. ग्रंथात सत्य असावे, म्हणूनच बाबांनी स्वतः ग्रंथातील 'नामसंकीर्तनयोग', 'सुवचनांतून शिकवणे (सुवचनांचा भावार्थ)' व 'प्रत्यक्ष शिकविणे', ही महत्त्वाची प्रकरणे विशेषकरून दृष्टीखालून घातली व इतर भाग प.पू. रामानंद महाराज यांच्याकडून वाचून घेतला.

'भूमिका' ही या ग्रंथाची एकप्रकारे प्रस्तावनाच आहे. 'भूमिके'त साधकांना उपयुक्त असे काही विषय (मुद्दे) आहेत; म्हणून 'भूमिके'ला 'प्रकरण' असे म्हटले आहे.

ग्रंथात ठिकठिकाणी दिलेल्या बाबांच्या भजनपंक्ती 'संत भक्तराज विरचित भजनामृत' या ग्रंथातील आहेत. – **संकलक**

## २. दुसऱ्या आवृत्तीची भूमिका

## [प.पू. भक्तराज महाराज यांचा अमृतमहोत्सव, माघ शुक्ल नवमी, कलियुग वर्ष ५०९६, ( ९ फेब्रुवारी १९९५ )]

**२ अ. ग्रंथ 'कठीण' आहे :** 'हा ग्रंथ समजायला पुष्कळ कठीण आहे', असे बरेच जण म्हणतात. तेव्हा ते सोपे करण्यासाठी बऱ्याच विषयांचे सविस्तर विवरण करू का ?', असे विचारल्यावर बाबा म्हणाले, "त्यांना म्हणावे नाम घ्या, म्हणजे पुस्तक समजेल." म्हणून आहे त्याच स्वरूपात ग्रंथ ठेवला आहे.

**- संकलक**

## ३. तिसऱ्या आवृत्तीची भूमिका

## [नरक चतुर्दशी, कलियुग वर्ष ५१०० ( १९ ऑक्टोबर १९९८ )]

९ फेब्रुवारी १९९५ या दिवशी बाबांचा अमृत महोत्सव झाल्यावर त्यांची प्रकृती ढासळली. तेव्हापासून १७ नोव्हेंबर १९९५ ला बाबांनी देहत्याग करेपर्यंत बहुतेक काळ आम्ही बाबांच्या समवेत राहिलो. प्रकृती ठीक नसतांनाही तेव्हा बाबांनी बरेच काही शिकविले. ते सर्व या तिसऱ्या आवृत्तीत समाविष्ट करण्यात आले आहे.

बाबांची शिकवण जात, पंथ, संप्रदाय इत्यादींच्या पुढे नेणारी, विश्वत्वाकडे नेणारी असल्याने मुखपृष्ठावर 'बाबा विश्वाला शिकवीत आहेत', असे दर्शविले आहे. बाबांना त्यांच्या गुरूंनीच हे सर्व शिकविलेले असल्याने बाबांच्या मागे सदोदित असलेले त्यांचे गुरु श्री अनंतानंद साईश यांचे चित्र मलपृष्ठावर छापले आहे.

**- संकलक**

## ४. चौथ्या आवृत्तीची भूमिका

## [मकरसंक्रांत, कलियुग वर्ष ५१०८ ( १४ जानेवारी २००७ )]

बाबांच्या देहत्यागानंतरही त्यांच्या अनंत शिकवणीतील आणखी काही नवीन विषय त्यांच्या सान्निध्यात राहिलेल्या काही भक्तांकडून मिळत गेले. ते विषय या चौथ्या आवृत्तीत समाविष्ट

करण्यात आले आहेत. त्यामुळे होणाऱ्या ग्रंथाच्या पृष्ठसंख्यावाढीच्या कारणास्तव या चौथ्या आवृत्तीची आम्ही नव्याने २ भागांमध्ये (‘खंड १’ आणि ‘खंड २’) पुनर्मांडणी केली.

**- संकलक**

## ५. पाचव्या आवृत्तीची भूमिका

**[अंगीरसऋषी जयंती, कलियुग वर्ष ५१११ ( १४ जून २००९ )]**

प.पू. भक्तराज महाराजांच्या काही भक्तांनी पाठवलेले नवीन लिखाण या आवृतीत अंतर्भूत केले  आहे. पृष्ठसंख्यावाढीच्या कारणास्तव या पाचव्या आवृत्तीचीही आम्ही नव्याने ३ भागांमध्ये पुनर्मांडणी केली आहे - ‘खंड १ : साधनेविषयी प्रत्यक्ष मार्गदर्शन’, ‘खंड २ : साधनाविषयक सुवचने’ आणि ‘खंड ३ : नामाची महती आणि शिकवण्याच्या विविध पद्धती’.

हा ग्रंथ वाचून काही जणांनी तरी साधनेला आरंभ करावा, अशी श्रीगुरुचरणी प्रार्थना !

**- संकलक**